# १० वी नंतर प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) अभ्यासक्रमासाठीच्या केंद्रीभूत  प्रवेश प्रक्रियेतील टप्पे

# प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) प्रवेश प्रक्रिया

१. प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) केंद्रीभूत प्रवेशासाठीचा प्रवेश अर्ज **https://poly25.dte.maharashtra.gov.in/diploma25/** या लिंकवर भरावा. अर्ज भरून झाल्यावर शेवटच्या टप्प्यात रु. ३०० किंवा रु ४०० प्रवेश प्रक्रिया शुल्क ऑनलाईन पद्धतीने जमा करावे. व शेवटी अर्जाची PDF कॉपी SAVE करून ठेवावी अथवा Print काढून ठेवावी.

**(**अर्ज भरण्याकरिता ग्रुपवर "प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज कसा भरावा" हे प्रेझेंटेशन बघावे**)**

२. तात्पुरती गुणवत्ता यादी (**PROVISIONAL MERIT LIST)** कशी बघावी.

३. प्रवेश अर्ज भरतांना **उर्वरित कागदपत्रे** जमा करण्यासाठीच्या व अर्जातील चुका दुरुस्ती करण्यासाठीच्या कालावधीत (GRIEVENCES PERIOD) **उर्वरित कागदपत्रे जमा करून अर्जातील चुका दुरुस्त कराव्या.**

४. अंतिम गुणवत्ता यादी (**FINAL MERIT LIST)** कशी बघावी.

# प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) प्रवेश प्रक्रिया

५. कॉलेजेस व ब्रँचेस (BRANCHES) निवड करण्यासाठी विकल्प अर्ज (OPTION FORM) भरावा लागतो. त्यासाठी खालील बाबींचा बारकाईने अभ्यास करणे गरजेचे आहे:

- **डिप्लोमा कॉलेजेसची यादी कोठे बघावी??**
- **एखाद्या कॉलेजची सविस्तर माहिती जसे शाखा (BRANCHES), प्रवेश क्षमता व इतर माहिती कशी शोधावी??**
- **कॉलेजेसची शासनाने ठरवून दिलेली फी कशी शोधावी??**
- **मागील वर्षी विशिष्ठ कॉलेजमध्ये एखाद्या ब्रँचसाठी CUT OFF कसा चेक करावा??**

- **या वरील बाबींचा सखोल अभ्यास केल्यावर मगच आपली प्राधान्यक्रमाने कॉलेजेस व ब्रँचेसची यादी तयार करावी.**

# प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) प्रवेश प्रक्रिया

६. **पहिल्या** राउंडसाठी **विकल्प अर्ज** (OPTION FORM) भरावा. पहिल्या राउंडसाठी **पसंतीक्रम** टाकतांना **पहिला पसंतीक्रम** अत्यंत काळजीपूर्वक भरावा कारण त्याला allotment **मिळाल्यास तेथे प्रवेश घेणे बंधनकारक आहे.**

७. **पहिल्या** राउंडसाठी मिळालेले कॉलेज व ब्रँच **(ALLOTMENT LIST)** कशी तपासावी.

**८. (अ) पहिल्या** राउंडसाठी allotment मिळालेल्या पर्यायास **प्रवेश निश्चित करू इच्छिणाऱ्या** अथवा **पहिलाच पसंतीक्रम** allotment मिळाले आहे अशा विद्यार्थ्यांनी **AUTOFREEZE / FREEZE** हा पर्याय निवडून रु. १०००/- हे प्रवेश निश्चित्ती शुल्क **(Seat Acceptance Fees)** ऑनलाईन पद्धतीने जमा करावे व **पहिल्या** राउंडसाठी मिळालेल्या कॉलेजला जाऊन मूळ कागदपत्रे व त्या कॉलेजची फी जमा करून प्रवेश निश्चित करावा.

***** **किंवा** *****

**८. (ब) पहिल्या** राउंडसाठी मिळालेल्या कॉलेज अथवा ब्रँचमध्ये **प्रवेश निश्चित न करू इच्छिणाऱ्या** विद्यार्थ्यांनी **NOT FREEZE** हा पर्याय निवडून रु. १०००/- हे प्रवेश निश्चित्ती शुल्क **(Seat Acceptance Fees)** ऑनलाईन पद्धतीने जमा करावे व **दुसऱ्या** राउंडसाठी पुन्हा पर्याय निवडावे.

# प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) प्रवेश प्रक्रिया

९. ज्या विद्यार्थ्यांना **पहिल्या** राउंडमध्ये प्रवेश मिळाला नाही (**NOT ALLOTED**) व ज्या विद्यार्थ्यांनी **पहिल्या** राउंडमधील मिळालेला प्रवेश नाकारला आहे **NOT FREEZE** अश्या विद्यार्थ्यांनी **दुसऱ्या** राउंडसाठी पुन्हा विकल्प अर्ज **(OPTION FORM)** भरावा. **दुसऱ्या** राउंडसाठी **पसंतीक्रम** टाकतांना **पहिले तीन पसंतीक्रम** अत्यंत काळजीपूर्वक भरावे कारण त्याला allotment **मिळाल्यास तेथे प्रवेश घेणे बंधनकारक आहे**)

१०. **दुसऱ्या** राउंडसाठी मिळालेले कॉलेज व ब्रँच **(ALLOTMENT LIST)** तपासणे

**११. (अ) दुसऱ्या** राउंडसाठी allotment मिळालेल्या पर्यायास **प्रवेश निश्चित करू इच्छिणाऱ्या** अथवा **पहिल्या तीन पसंतीक्रमांपैकी एकास** allotment मिळाले आहे अशा विद्यार्थ्यांनी **AUTOFREEZE / FREEZE** हा पर्याय निवडून रु. १०००/- हे प्रवेश निश्चित्ती शुल्क **(Seat Acceptance Fees)** ऑनलाईन पद्धतीने जमा करावे व **दुसऱ्या** राउंडसाठी मिळालेल्या कॉलेजला जाऊन मूळ कागदपत्रे व त्या कॉलेजची फी जमा करून प्रवेश निश्चित करावा.

# प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) प्रवेश प्रक्रिया

******* किंवा *******

**११. (ब) दुसऱ्या** राउंडसाठी मिळालेल्या कॉलेज अथवा ब्रँचमध्ये **<u>प्रवेश निश्चित न करू इच्छिणाऱ्या</u>** विद्यार्थ्यांनी **<u>NOT FREEZE</u>** हा पर्याय निवडून रु. १०००/- हे प्रवेश निश्चित्ती शुल्क **(Seat Acceptance Fees)** ऑनलाईन पद्धतीने जमा करावे व **तिसऱ्या** राउंडसाठी पुन्हा पर्याय निवडावे.

१२ ज्या विद्यार्थ्यांना **दुसऱ्या** राउंडमध्ये प्रवेश मिळाला नाही <u>(**NOT ALLOTED**</u>) व ज्या विद्यार्थ्यांनी **दुसऱ्या** राउंडमधील मिळालेला प्रवेश नाकारला आहे **<u>NOT FREEZE</u>** अश्या विद्यार्थ्यांनी **तिसऱ्या** राउंडसाठी पुन्हा विकल्प अर्ज **(OPTION FORM)** भरावा. **तिसऱ्या** राउंडसाठी **पसंतीक्रम** टाकतांना **पहिले सहा पसंतीक्रम** अत्यंत काळजीपूर्वक भरावे कारण त्याला allotment **मिळाल्यास तेथे प्रवेश घेणे बंधनकारक आहे**)

१३. **तिसऱ्या** राउंडसाठी मिळालेले कॉलेज व ब्रँच **(ALLOTMENT LIST)** तपासणे

# प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) प्रवेश प्रक्रिया

**१४. (अ) तिसऱ्या** राउंडसाठी allotment मिळालेल्या पर्यायास **<u>प्रवेश निश्चित करू इच्छिणाऱ्या</u>** अथवा **पहिल्या सहा पसंतीक्रमांपैकी एकास** allotment मिळाले आहे अशा विद्यार्थ्यांनी **<u>AUTOFREEZE / FREEZE</u>** हा पर्याय निवडून रु. १०००/- हे प्रवेश निश्चित्ती शुल्क (Seat Acceptance Fees) ऑनलाईन पद्धतीने जमा करावे व **तिसऱ्या** राउंडसाठी मिळालेल्या कॉलेजला जाऊन मूळ कागदपत्रे व त्या कॉलेजची फी जमा करून प्रवेश निश्चित करावा.

***** **किंवा** *****

**१४. (ब) तिसऱ्या** राउंडसाठी मिळालेल्या कॉलेज अथवा ब्रँचमध्ये **<u>प्रवेश निश्चित न करू इच्छिणाऱ्या</u>** विद्यार्थ्यांनी **<u>NOT FREEZE</u>** हा पर्याय निवडून रु. १०००/- हे प्रवेश निश्चित्ती शुल्क (Seat Acceptance Fees) ऑनलाईन पद्धतीने जमा करावे व **चौथ्या** राउंडसाठी पुन्हा पर्याय निवडावे.

# प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) प्रवेश प्रक्रिया

१५. ज्या विद्यार्थ्यांना **तिसऱ्या** राउंडमध्ये प्रवेश मिळाला नाही (**NOT ALLOTED**) व ज्या विद्यार्थ्यांनी **तिसऱ्या** राउंडमधील मिळालेला प्रवेश नाकारला आहे **NOT FREEZE** अश्या विद्यार्थ्यांनी **चौथ्या** राउंडसाठी पुन्हा विकल्प अर्ज **(OPTION FORM)** भरावा. **चौथ्या** राउंडसाठी **पसंतीक्रम** टाकतांना **सर्व पसंतीक्रम** अत्यंत काळजीपूर्वक भरावे कारण त्याला allotment **मिळाल्यास तेथे प्रवेश घेणे बंधनकारक आहे**)

१६. **चौथ्या** राउंडसाठी मिळालेले कॉलेज व ब्रँच (ALLOTMENT LIST) तपासणे

# प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) प्रवेश प्रक्रिया

१७. (अ) **चौथ्या** राउंडसाठी allotment मिळालेल्या पर्यायास **प्रवेश निश्चित करू इच्छिणाऱ्या** विद्यार्थ्यांनी **FREEZE** हा पर्याय निवडून रु. १०००/- हे प्रवेश निश्चित्ती शुल्क (Seat Acceptance Fees) ऑनलाईन पद्धतीने जमा करावे व **चौथ्या** राउंडसाठी मिळालेल्या कॉलेजला जाऊन मूळ कागदपत्रे व त्या कॉलेजची फी जमा करून प्रवेश निश्चित करावा.

***** **किंवा** *****

**१७. (ब) चौथ्या** राउंडसाठी मिळालेले कॉलेजमधील ब्रँचमध्ये **प्रवेश निश्चित न करू इच्छिणाऱ्या** विद्यार्थ्यांनी शेवटच्या प्रत्येक कॉलेजच्या स्तरावरील होणाऱ्या समुपदेशन राउंड (COUNSELLING ROUND) साठी **संबंधित कॉलेजमध्ये** प्रत्यक्ष जावून अथवा त्या कॉलेजच्या वेबसाईटवर COUNSELLING ROUND साठीचे वेळापत्रक व प्रवेश प्रक्रिया जाणून घ्यावी. सदर प्रवेश प्रक्रियेसाठी संबंधित कॉलेजला वेळापत्रकानुसार **मूळ कागदपत्रे** व कॉलेजची ***पूर्ण*** फी घेऊन **प्रत्यक्ष उपस्थित** राहणे गरजेचे आहे.

# प्रथम वर्ष पदविका (डिप्लोमा) प्रवेश प्रक्रिया

(**** **COUNSELLING ROUND** **राउंडमध्ये व INSTITUTE LEVEL राउंडमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या सवलती अथवा शिष्यवृत्ती मिळणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.** ****)

१८. **COUNSELLING ROUND** मध्ये प्रवेश मिळाल्यावर **तेथेच लागलीच** मूळ कागदपत्रे व त्या कॉलेजची फी जमा करून प्रवेश निश्चित करावा.

**टीप- प्रवेश निश्चिती शुल्क १००० रुपये हे ४ राऊंड दरम्यान एकदाच भरावे लागते.**